# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>
## कार्यकारीणी सभा

**दिनांक** : सोमवार ०२ ऑक्टोबर २०१७
**स्थळ** : १४ कर्मचारी निवास, शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल, अंधेरी – पूर्व, मुंबई – ४०० ०५३.

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| 1. श्री मंगेश मनोहर राणे | 6. श्री गुरुनाथ गणपत राणे (आमंत्रित) |
| 2. श्री सुनिल सदानंद राणे | 7. श्री प्रविण मधुकर राणे (आमंत्रित) |
| 3. श्री दशरथ दत्ताराम साटम | 8. श्री लवू शिवाजी राणे (आमंत्रित) |
| 4. श्री पांडुरंग सावजी राणे | |
| 5. श्री अशोक दत्ताराम राणे | |
| 6. श्री भरत गणपत राणे | |

फळसेवाडी हितकारी संस्थेच्या कार्यकारिणीची सभा संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांचे निवासस्थानी (शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल येथे) घेण्यात आली. सभेस कार्यकारीणीतील ६ सदस्य तसेच ३ आमंत्रित ग्रामस्थ उपस्थित होते.

श्री सुनिल सदानंद राणे, सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले. अध्यक्षांच्या परवानगीने सभेस सुरवात करताना सचिवांनी प्रथमत: विषयपटलावरील विषय उपस्थितांस वाचून दाखविले.

विषय क्रमांक १  अंर्तगत श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी माहीती दिली की दिनांक १७ जून २०१७ आणि दिनांक १२ ऑगष्ट २०१७ रोजी झालेल्या कार्यकारीणीच्या सभांची इतिवृत्त तयार आहेत. परंतू घरातील प्रिंटर नादुरुस्त झाल्यामुळे या  इतिवृत्तांच्या प्रिंट काढता आल्या नाहीत व याकारणे आजच्या सभेपुढे ही इतिवृत्ते मांडून त्यांची मंजूरी घेता येत नाही. या दोन्ही सभांची इतिवृत्ते पुढील सभेत मंजूरीसाठी ठेवली जातील. <u>उपस्थितांनी याची नोंद घेऊन पुढील सभेत ही इतिवृत्ते मंजूरीसाठी ठेवण्याची सूचना केली</u>.

विषय क्रमांक २ अंर्तगत गावी गणेशोत्सवादरम्याण म्हणजेच दिनांक २७ ऑगष्ट २०१७ रोजी घेतलेल्या सर्वसाधारण सभेविषयी माहीती देतांना सचिवांनी सांगितले की या सभेस ३६ ग्रामस्थ (मुंबईहून गणेशोत्सवासाठी गेलेल्यांसहीत) उपस्थित होते. या सभेत वाडीच्या हितासंबधी करण्यात येणाऱ्या योजनांबाबत ग्रामस्थांची चर्चा करण्यात आली असता उपस्थितांकडून / ग्रामस्थांकडून त्यास सकारात्मक प्रतिसाद मिळाला. या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त ताबडतोब तयार करण्यात येऊन ग्रामस्थांस वाचून दाखविण्यात आले व इतिवृत्तास ग्रामस्थांची मंजूरीही मिळविण्यात आली. सचिवांनी दिनांक २७ ऑक्टोबर २०१७ रोजी गावी घेण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेचे मंजूर करण्यात आलेले इतिवृत्त सर्वांच्या माहीतीसाठी वाचून दाखवायचे का ? अशी विचारणा केली असता उपस्थितांनी त्याची जरूरी नसल्याचे सांगून मंजूर करण्यात आलेले  इतिवृत्त संस्थेच्या संकेत स्थळावर टाकण्याची सुचना केली.

विषय क्रमांक ३ अंर्तगत सचिवांनी उपस्थितांस माहीती दिली की दिनांक १२ ऑगष्ट २०१७ रोजी झालेल्या कार्यकारीणीच्या सभेत इतर विषयांबरोबर गणपती उत्सवापूर्वी वाडीवर सार्वजनिक दिवाबत्ती लावण्याचा प्रयत्न करण्याचे ठरविण्यात आले होते. या संर्दभात श्री विजय संभाजी राणे यांनी त्याच्या ओळखीतून एल ई डी दिवे सवलतीच्या दरात मिळवून देईन असे आश्वासन दिले होते. श्री विजय संभाजी राणे यांनी संस्थेकडून या दिव्यांसाठी कोणतीही आगाऊ रक्कम न घेता तत्परतेने ८ एल ई डी दिवे (२ दिवे ६० वॅटचे आणि ६ दिवे ४० वॅटचे) संस्थेस उपलब्ध करून दिले. या दिव्यांची किंमत त्यांनी अजूनपर्यंत कळवलेली नसल्यामुळे त्यांचेशी संर्पक साधून पुढील वेळी बिले सभेपुढे ठेवण्यात येतील.

सचिवांनी श्री विजय संभाजी राणे यांनी त्यांचे स्वत:चे जोखमीवर / पतीवर एल ई डी दिवे वेळीच उपलब्ध करून संस्थेस केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानले.

त्यापुढे सचिवांनी माहीती दिली की उपलब्ध एल ई डी दिवे वाडीवर ८ ठिकाणी बसविण्यात आले असून त्यापैकी ४ दिवे पूर्वी असलेल्या सार्वजनिक दिव्यांच्या जागी लावण्यात आलेले असून ४ दिवे नविन ठिकाणी लावण्यात आलेले आहेत. नविन ठिकाणी लावण्यात आलेल्या दिव्यांसाठी श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी स्थानिक कार्यकारिणी सदस्य श्री स़ंकेत रत्नाकर राणे यांच्या सहकार्याने खांबांची तसेच इतर साहित्याची व्यवस्था केली. कामगार मिळत नसल्यामुळे हि बाब दिनांक २७ ऑगष्ट २०१७ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत मांडल्यावर श्री स्वप्निल पांडूरंग राणे यांनी पुढाकार घेऊन आणि स्थानिक तसेच मुंबईहून गावी गलेल्या युवकांना प्रेरीत करून हे काम त्यांचेकडून गणेशोत्सवादरम्याण करून घेतले.

सध्या सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आलेले दिवे चालू असून इतर ४ ठिकाणी लावलेल्या दिव्यांसाठी ग्रामस्थाच्या घरातून वीजपूरवठा घेतला गेला असल्यामुळे हे ४ दिवे ग्रामस्थांनी चालू केल्यावरच चालू शकतात. सचिवांनी पुढे माहीती दिली कि श्री संकेत रत्नाकर राणे यांस या दिव्यांना सार्वजनिक दिवाबत्ती लाईनवर जोडण्यासाठी किती वायर लागू शकेल किंवा किती खर्च येईल याचा अंदाज देण्याची सूचना करण्यात आली आहे.

सचिवांनी पुढे माहीती दिली की ब्राम्हणविहीर असलेली जागा तसेच डोहाच्या चिंचेजवळ बाधण्यात येणाऱ्या प्रयोजित विहीरीसाठी लागणारी जागा या जागांच्या मालकीसंबधी सार्वजनिक सभेचेवेळी स्पष्टता न दिसल्याकारणे जोपर्यंत याबाबत स्पष्टता मिळत नाही तोपर्यंत कोणाकडूनही बक्षिसपत्र घेऊ नये असे ठरविण्यात आले.

विषय क्रमांक ४ अंर्तगत सभासद नोंदणी प्रगतीची माहीती देताना सचिवानी सांगितले आज सभेदरम्याण मिळालेले फार्म विचारात घेता आजपर्यंत एकून फक्त २९ सभासदांकडून नोंदणीचे फार्म मिळालेले आहेत. यापैकी नविन सभासद नोंदणीला फक्त १५ ग्रामस्थाकडून प्रतिसाद मिळालेला असून उर्वरीत १४ फार्म हे जूण्या सभासदाकडून भरून आलेले आहेत. या अत्यल्प प्रतिसादाचे विश्लेषन करता असे आढळले की कार्यकारीणी सदस्य तसेच नेमलेले ग्रामस्थ अजून सर्व ग्रामस्थापर्यंत पोहोचले नाहीत.

श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी सांगितले की या कामासाठी आपण विभागवार वाटणी केली असून प्रत्येक विभागासाठी कमीतकमी दोन ग्रामस्थांची नेमणूक केलेली आहे. प्रत्येक विभागात जास्तीत जास्त १० घरे असल्यामुळे नेमणूक करण्यात आलेल्या ग्रामस्थांनी या कामाची पूर्तता जबाबदारीने करण्याचे ठरविल्यास या कामास महीणाभरापेक्षा जास्त वेळ लागू नये.

सचिवांनी उपस्थितांना सूचना केली की ऑक्टोबर महिण्यात प्रत्येकांने त्याला नेमून दिलेल्या विभागातील सर्वच्या सर्व ग्रामस्थांच्या घरी पोहोचण्याचा प्रयत्न करून सभासद नोंदणी लवकरात लवकर पूर्ण करावी जेणेकरून आपणांस लवकरच वार्षिक सर्वसाधारण सभा बोलविता येईल. सभासद नोंदणी वाढल्यावर आपण योजिलेल्या योजनांसाठी नेते, आस्थापणे यांचेशी संर्पक करून त्यांचेकडून निधी मिळविण्याचा प्रयत्न करता येईल. सचिवांनी सर्वांना सांगितले सभासद नोंदणीच्या या प्राथमिक कामासाठी सर्वांच्या सहकार्यांची अपेक्षा ते बाळगत आहेत.

सचिवांनी इतर विषयांबद्दल विचारणा केली असता उपस्थितांकडून कोणतेही नविन विषय / योजना मांडण्यात आल्या नाहीत. कार्यकारीणीची पुढील सभा नोव्हेंबर महिण्यात घ्यावयासाठी उपस्थितांशी विचारविनमय करण्यात आला असता उपस्थितांनी नोव्हेंबर महिण्याच्या पहिल्या आठवड्यात म्हणजे ४ नोव्हेंबर २०१७ या तारखेस कार्यकारीणीची सभा घेण्यास पसंती दर्शविली.

ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली याबद्दल सर्व उपस्थितांचे आभार मानून सचिवांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

या कार्यक्रमाचा चहापाणी खर्च संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांनी केल्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले.

---